पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा. शिक्षण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ०९

**सभावृत्तांत**

दिनांक - **१९/१२/२०१९** वेळ - **दुपारी २.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा **गुरुवार** दिनांक **१९/१२/२०१९** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा. पवार मनिषा प्रमोद - सभापती**
२. मा.गायकवाड निर्मला मनोज
३. मा.कदम शशिकांत गणपत
४. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
५. मा.दर्शले रेखा राजेश

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग) मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी(माध्यमिक विभाग) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या १२ उपक्रमशील प्राथमिक शाळेतील इ.५ वी ते ८ वी तील विद्यार्थांना टॅब खरेदी करणेबाबत. – मा.निर्मला गायकवाड, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव

विषय क्र.३) बालवाडीताईंना सेवानिवृत्ती नंतर शासन निर्णयानुसार लाभ मिळणेबाबत. – मा.रेखा दर्शले, मा.निर्मला गायकवाड यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) शिक्षण विभागाकडील प्राथमिक शाळांना मे.सायबरनेट डॉट इट प्रा.लि.,पुणे यांचा तांत्रिक प्रस्तावाप्रमाणे डिजीटल क्लास रुम सुविधा निर्माण करणेबाबत. – मा.रेखा दर्शले, मा.निर्मला गायकवाड यांचा प्रस्ताव

विषय क्र.५) पिं.चिं.महानगरपालिकेच्या सन २०१९-२० सालाकरिता प्राथमिक शाळेतीलविद्यार्थांसाठी स्काऊट गाईड गणवेश खरेदी करणेबाबत.- मा.रेखा दर्शले, मा.निर्मला गायकवाड

विषय क्र.६) पिं.चिं.महानगरपालिकेच्या सन २०१९-२० सालाकरीता प्राथमिक शाळेतील इ.५ वी ते इ.८ वी तील विद्यार्थ्यांसाठी हाफ जाकेट खरेदी करण्याबाबत. – मा.रेखा दर्शले, मा.निर्मला गायकवाड यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) पिं.चिं.महानगरपालिकेच्या सन २०१९-२० सालाकरिता प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी पौष्टिक आहार करीता मध्यानामध्ये अंडी व फळे उपलब्ध करुन देण्याबाबत. – मा .रेखा दर्शले, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) पिं.चिं.महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी पाणी पिण्याकरीता सन २०१९-२० सालाकरीता कॉपर वॉटर बॉटल खरेदी करण्याकरीता.- मा.रेखा दर्शले, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव.

विषय क्र ९) पिं.चिं.महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेतील ग्रंथालयांमध्ये विद्यार्थ्यांसाठी मे.अनुश्री प्रकाशन, पुणे यांच्याकडून थेट पध्दतीने पुस्तके खरेदी करणेबाबत. – मा.शशिकांत कदम, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

**---------**

**खालीलप्रमाणे सुचना मांडण्यात आली**

सुचक – मा.भाऊसाहेब भोईर                                        अनुमोदक – मा.निर्मला गायकवाड

डॉ.श्रीराम लागू, ज्येष्ठ अभिनेते, यमुनाबाई ज्ञानोबा काळभोर – मा.वैशाली काळभोर, सदस्य शिक्षण समिती यांच्या सासूबाई, तसेच दिनकरराव शिंदे, सामाजिक कार्यकर्ते यांचे नुकतेच निधन झालेले असल्याने आजच्या सभेत वरील मान्यवरांना श्रध्दांजली अर्पण करुन सदर सभा सोमवार , दिनांक २३/१२/२०१९ रोजी दुपारी १२.०० वा. पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)**

**सभापती –** सोमवार दि.२३/१२/२०१९ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**(पवार मनिषा प्रमोद )**
**सभापती**
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. शिक्षण समिती

कार्यपत्रिका क्रमांक - ०९

**सभावृत्तांत**

( १९/१२/२०१९ ची तहकूब सभा )

दिनांक - २३/१२/२०१९ वेळ – दुपारी १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची दिनांक १९/१२/२०१९ ची तहकूब सभा सोमवार दिनांक २३/१२/२०१९ रोजी दुपारी १२.०० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा. पवार मनिषा प्रमोद - सभापती**
२. मा.गायकवाड निर्मला मनोज
३. मा.कदम शशिकांत गणपत
४. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
५. मा.दर्शले रेखा राजेश

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग) मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

ठराव क्रमांक – २१ विषय क्रमांक - ०१
दिनांक - २३/१२/२०१९ विभाग – शिक्षण (प्राथमिक)
सुचक : मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.रेखा दर्शले
संदर्भ : मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र क्र.शिमं/९अ/कावि/१२५/२०१९ दि.०३/१२/२०१९

मा. अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड म.न.पा. शिक्षण विभागाच्या वतीने सालाबाद प्रमाणे दि.०५ सप्टेंबर २०१९ चा शिक्षक दिन कार्यक्रम दि.१२ सप्टेंबर २०१९ रोजी वार गुरूवार सकाळी १०.०० वाजता प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड येथे आयोजित करणेत आलेला होता. सदर कार्यक्रमास आदर्श शाळा व गुणवंत शिक्षकांना सन्मानित करण्यात आले होते. शिक्षक दिन साजरा करणेकामी किरकोळ खर्चाकरिता र.रू.६०,०००/- चे अग्रिम घेण्यात आले होते. तसेच सदर कार्यक्रमामध्ये सत्कारार्थी यांना द्यावयाचे सन्मानचिन्हे / स्मृतिचिन्हे, प्रमाणपत्र व निमंत्रणपत्रिका वेदपाठक क्रिसीएशन यांचेमार्फत थेट पध्दतीने घेण्यात आलेले असून याकरिता एकूण र.रू.४७,३५०/- इतका खर्च झालेला आहे. शिक्षक दिन कार्यक्रमास एकूण र.रू.१,०७,३५०/- इतका खर्च झालेला आहे. तरी कार्यक्रमास झालेला एकूण खर्च र.रू.१,०७,३५०/- (अक्षरी र.रु.एक लाख सात हजार तीनशे पन्नास फक्त ) यांस कार्योत्तर

मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - २२ विषय क्रमांक - ०२

दिनांक - २३/१२/२०१९

सुचक : मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.रेखा दर्शले

संदर्भ :- मा.निर्मला गायकवाड, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या १२ प्राथमिक शाळा हया उपक्रमशील आहेत. सदर शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये ही आपल्या शाळेविषयी तसेच अधिकाअधिक शिक्षणाची आवड निर्माण होण्याकरीता विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरीता शिक्षण विभागामार्फत १२ उपक्रमशील प्राथमिक शाळेतील इ.५ वी ते इ.८ वी तील विद्यार्थ्यांना टॅब खरेदी करणेकामी होणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २३ विषय क्रमांक - ०३

दिनांक - २३/१२/२०१९

सुचक : मा.रेखा दर्शले अनुमोदक : मा.निर्मला गायकवाड

संदर्भ :- मा.रेखा दर्शले, मा.निर्मला गायकवाड यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील एकूण २०७ बालवाडीताई, १,मुख्य समन्वयक, २ विभागीय समन्वय व २ सेविका असे एकूण २१२ कर्मचारी कार्यरत आहेत त्यांना सेवानिवृत्ती नंतर कोणत्याही प्रकारचा लाभ सद्या मिळत नाही. तरी याकामी शासन निर्णयानुसार बालवाडी ताईंना एक लाख रुपये लाभ देणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २४ विषय क्रमांक - ०४

दिनांक - २३/१२/२०१९

सुचक : मा.रेखा दर्शले अनुमोदक : मा.निर्मला गायकवाड

संदर्भ :- मा.रेखा दर्शले, मा.निर्मला गायकवाड यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडील प्राथमिक शाळांमध्ये ई लर्निंग अंतर्गत विदयार्थी - विदयार्थ्यानींना संगणक व प्रोजेक्टर च्या सहाय्यने अत्याधुनिक पध्दतीचे

तांत्रिक शिक्षण सुविधा उपलब्ध होणेकामी डिजीटल क्लास रुम सुरु करणे गरजेचे आहे. सदयस्थितीमध्ये मनपा शाळांमध्ये खालील प्रमाणे सुधारणा करणे आवश्यक आहे. १) डेव्हलप ॲण्ड प्रोव्हाईड ऑडीओ व व्हिज्युअल ई-लर्निंग स्कूल कन्टेंट (स्टेट बोर्डच्या अभ्यासक्रमानुसार) २) सेटअप इन्स्टॉल्ड इन प्रीव्हिलीज्ड स्कूल, ३) सेटअप मेन्टेन्ड ॲण्ड अपग्रेडेट फॉर ३ ईअर, ४) शिक्षकांना वापरातील डीजीटल तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देणे. उपरोक्त डीजीटल क्लास रूम सुरू करणेसाठी खालीलप्रमाणे सोई-सुविधा करणे अपेक्षित आहे. १) शाळेचे अभ्यासक्रमानुसार ई-लर्निंग सॉफ्टवेअर तयार करणे व याकामी एलईडी टीव्ही उपलब्ध करणे. २) शाळेचे अभ्यासक्रमानुसार ई-लर्निंग सॉफ्टवेअर सह स्कूल कॉम्प्युटर लॅब व्यवस्था करणे, ३) ई-लर्निंग सॉफ्टवेअर सह टॅबलेट पीसी - शाळेचे इयत्ते व अभ्यासक्रमानुसार ई-लर्निंग सॉफ्टवेअर मॅपींग करणे, उपरोक्त कामकाजासाठी मे.सायबरनेट डॉट इट प्रा.लि., शिवाजीनगर, पुणे यांचा तांत्रिक प्रस्ताव प्राप्त झाला असून त्याची प्रत माहितीस्तव सोबत जोडली असन, त्यांचे तांत्रीक प्रस्तावाप्रमाणे डिजीटल क्लास रुम सुविधा सुरू करणेकामी व त्यास प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २५ विषय क्रमांक - ०५

दिनांक - २३/१२/२०१९

सुचक : मा.रेखा दर्शले अनुमोदक : मा.निर्मला गायकवाड

संदर्भ :- मा.रेखा दर्शले, मा.निर्मला गायकवाड यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक विद्यालयामध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थ्यांमध्येही आपल्या शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरीता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थ्यामध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरीता व महानगरपालिका शाळांची पटसंख्या वाढण्याकरीता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शाळेतील विद्यार्थी हे स्काऊट गाईडचे प्रशिक्षण घेत आहेत. सदर विद्यार्थ्यांसाठी स्काऊट गाईड गणवेश उपलब्ध करुन दिल्यास विद्यार्थ्यांमध्ये गोडी निर्माण होऊन त्यांचा उत्साह वाढेल. यास्तव विद्यार्थ्यांसाठी स्काऊट गाईड गणवेश खरेदी करणेकामी होणा-या खर्चास् मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २६ विषय क्रमांक - ०६

दिनांक - २३/१२/२०१९

सुचक : मा.रेखा दर्शले अनुमोदक : मा.निर्मला गायकवाड

संदर्भ :- मा.रेखा दर्शले, मा.निर्मला गायकवाड यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक विद्यालयामध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थ्यामध्येही महापालिकेच्या शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरीता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरीता व महापालिका शाळांची पटसंख्या वाढयाकरीता शिक्षण समिती प्रयत्न करित आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे खाजगी शाळेतील विद्यार्थ्यांप्रमाणे आत्मविश्वास निर्माण करण्याकरीता तसेच विद्यार्थ्यांच्या पेहरावात आकर्षकपणा येणेकामी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१९-२० सालाकरीता प्राथमिक शाळेतील इ.५ वी ते इ.८ वी तील विद्यार्थ्यांसाठी हाफ जॅकेट खरेदी करणेस व होणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७ विषय क्रमांक - ०७

दिनांक - २३/१२/२०१९

सुचक : मा.रेखा दर्शले अनुमोदक : मा.शशिकांत कदम

संदर्भ :- मा.रेखा दर्शले, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक विद्यालयामध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी , विद्यार्थ्यांमध्येही महापालिका शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व महापालिका शाळांची पटसंख्या वाढण्याकरीता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. त्याचबरोबर महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांच्या आरोग्य हितासाठी शिक्षण समिती प्रयत्नशील आहे. त्याच अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यासाठी मध्यान भोजनाच्या वेळी पौष्टिक आहार म्हणून शिक्षण विभागामार्फत विद्यार्थ्यांसाठी अंडी व एक फळ (उदा.सफरचंद, डाळिंब, केळी इ.) उपलब्ध करुन देण्यास व याकामी होणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २८ विषय क्रमांक - ०८

दिनांक - २३/१२/२०१९

सुचक : मा.रेखा दर्शले अनुमोदक : मा.शशिकांत कदम

संदर्भ :- मा.रेखा दर्शले, मा.शशिकांत कदम यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक विद्यालयामध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थामध्येही मनपा शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच

मनपा शाळेतील विद्यार्थामध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व शाळेतील पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. त्याचबरोबर मनपा शाळातील विद्यार्थ्यांच्या आरोग्य हितासाठी शिक्षण समिती प्रयत्नशील आहे. त्याच अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळेतील विद्यार्थासाठी पाणी पिण्याकरिता कॉपर वॉटर बॉटल खरेदी करण्याकरिता लवकरात लवकर निविदा प्रक्रिया राबवून सन २०१९-२० सालाकरिता सर्व प्राथमिक शाळेतील विद्यार्थासाठी कॉपर बॉटल खरेदी करणेस व त्यासाठी होणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २९ विषय क्रमांक - ०९

दिनांक - २३/१२/२०१९

सुचक : मा. शशिकांत कदम अनुमोदक : मा. रेखा दर्शले

संदर्भ :- मा. शशिकांत कदम, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक विद्यालयामध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी विद्यार्थामध्येही मनपा शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील, विद्यार्थामध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. त्याच अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेत विद्यार्थासाठी ग्रंथालये उपलब्ध करण्यात आले आहे. शिक्षण समिती सदस्यांनी शाळेमध्ये दौरा केला असता शाळेतील ग्रंथालयामध्ये विद्यार्थासाठी पुस्तके कमी प्रमाणात किंवा काही ठिकाणी ग्रंथालयांमध्ये पुस्तकेच नसल्याचे निदर्शनास आले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेत ग्रंथालयामध्ये विद्यार्थ्यांसाठी बौद्धिक विकास, सकारात्मक विचार, शैक्षणिक विकास अभ्यासक्रमाची पुस्तके अशी मार्गदर्शनात्मक पुस्तके खरेदी केल्यास त्याचा फायदा प्राथमिक शाळेतील विद्यार्थाना होऊन त्यांना शाळेविषयी आवड निर्माण होऊन त्यांच्या बौद्धिक गुणवत्तेचा विकास होईल. मे.अनुश्री प्रकाशन, पुणे यांच्याकडून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेतील ग्रंथालयांमध्ये विद्यार्थासाठी पुस्तके खरेदी करण्याबाबत प्रस्ताव प्राप्त झाला असून सदर पुस्तके खरेदीवर १५% सवलत देण्याचे व स्वखर्चाने पुस्तके शाळेत पुरविण्याबाबत कळविले आहे. प्राथमिक शिक्षण विभागामध्ये सन २०१९-२० सालाकरिता " शालेय / शिक्षक ग्रंथालय " या लेखाशिर्षावर दोन लाख रुपये उपलब्ध असल्याने मे.अनुश्री प्रकाशन, पुणे यांच्याकडून पिपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व प्राथमिक शाळेतील ग्रंथालयांमध्ये विद्यार्थासाठी थेट पद्धतीने पुस्तके खरेदी करणेस तसेच होणा-या र.रु.२,००,०००/-(अक्षरी र.रु.दोन लाख फक्त ) खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

( विषय क्र.४ चे संलग्न)

cybernet.it
Private Limited
NSIC-CRISIL SE2B

To,
Honorable Sabhapati,
Education Department,
Pimpri-Chinchwad Municipal Corporation.

Date : December 4, 2019
Ref. : CYB/Q/N/041219/01

**Subject: Technical proposal of Digital Class-Room (Education Software)**

Res. Sir/Madam,

We Cybernet IT Pvt. Ltd. take this opportunity to present our Digital Class-Room Solution to Education Department of PCMC. Our vision is to provide technology supported quality education to masses, at affordable cost. This is Comprehensive Knowledge and Education System for schools & educational institutes.

**What we do**

- Develop & provide audio-visual eLearning school content (State Board based curriculum)
- Setups installed in underprivileged schools
- Setup maintained and upgraded for 3 years
- Train the teachers in using technology

**Impact Digital Class-Room (audio-visual eLearning)**

- Reduced school dropouts and absenteeism
- Improved passing percentages and
- subject wise scores
- Better conceptual understanding
- Above all gained confidence in students

**What we offer**

- LED TV with E-Learning software, mapped to school syllabus.
- School Computer Lab with E-Learning software, mapped to school syllabus.
- Tablet with E-Learning software: standard wise e-learning mapped to school curriculum

**Why Us**


- Experienced and trained Business Development Executives to provide tailor-made solutions.
- Experienced, trained and fleet of installation-service Executives for speedy, flawless execution at remote villages.
- Dedicated Customer Care Center for instant response.
- Experience of 4,000+ installations specifically under CSR initiatives and 2000+ others.
- Recognition for donors in the software and thru plaque outside classroom.

Office No. 6, Shrinath Plaza, F. C. Road, Dnyaneshwer Paduka Chowk, Shivajinagar, Pune - 411 005
Tel. : 25539384, 25539147, 25520661 Fax : 25520662 E-mail : sales@cybernetit.com

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( पवार मनिषा प्रमोद )**
सभापती
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/५७५ /२०१९
दिनांक : २७ /१२/२०१९



(उल्हास बबनराव जगताप)
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.